SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ No - 1212 दि. 4 JAN 2024

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- विद्यापीठामार्फत रौप्य, सुवर्ण, अमृत आणि शतक महोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या संलग्नीत महाविद्यालयांना मदत करण्याबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त नमूद विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२२-२३** आणि २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये रौप्य, सुवर्ण, अमृत आणि शतक महोत्सवी वर्षात जी महाविद्यालये पदार्पण करित आहेत (स्थापनेपासून २५ वर्षे, ५० वर्षे, ७५ वर्षे आणि १०० वर्षे पूर्ण करणारी महाविद्यालये) फक्त आणि फक्त अशाच संलग्नीत महाविद्यालयांनी आपले प्रस्ताव गुगल फॉर्ममध्ये भरून विद्यापीठास दि. १५/०१/२०२४ पर्यंत पाठवावेत.

गुगल फॉर्म ची लिंक पुढील प्रमाणे- **https://forms.gle/9zhpNTtpWbnvXVvp8**

कळावे,

आदेशान्वये

श्री. विलास एस. सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत- वरीलप्रमाणे

## नियमावली :

१. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून पात्र महाविद्यालयासाठी लागू राहील.

२. ज्या महाविद्यालयांना अनुक्रमे २५, ५०, ७५, व १०० शैक्षणिक वर्ष पूर्ण होणार आहेत, त्या महाविद्यालयांना विद्यापीठाकडून प्रोत्साहनपर विशेष आर्थिक मदत खालीलप्रमाणे करण्यात येईल.

| शैक्षणिक वर्ष | प्रोत्साहनपर निधी |
|---|---|
| २५ | रू. २.५ लाख |
| ५० | रू. ५ लाख |
| ७५ | रू. ७.५ लाख |
| १०० | रू. १० लाख |

३. या योजनेअंतर्गत विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या रक्कमेचा उपयोग महाविद्यालयाने अत्यावश्यक बाबी पूर्ण करण्यासाठी, उदा. पुस्तके, ग्रंथालय, परिक्षा स्ट्राँगरूम, भौतिक सुविधा इ. साठी करणे वापरणे आवश्यक आहे.

४. संबंधीत पात्र महाविद्यलयांनी त्यांना मिळालेल्या रक्कमेचा विनियोग योग्य पध्दतीने करून उपयोगीता प्रमाणपत्र विद्यापीठास वेळेत सादर करणे बंधनकार आहे.

५. महाविद्यालयाचे नॅक झालेले असावे.

६. महाविद्यालयास 2 (F) व 12 (B) युजीसी मान्यता असावी.

७. अनुदान पायाभूत सुविधांसाठीच खर्च करावे.

८. विद्यापीठाने मंजूर केलेल्या निधीतून केलेले विकास कामाचा दर्शनी भागावर शिवाजी विद्यापीठाचा उल्लेख असाव.

९. विद्यापीठाने मंजूर केलेली रक्कम त्याच कारणास्तव खर्च करावी.

१०. सोबत उपरोक्त महोत्सवी वर्षासाठी महाविद्यालयाने करावायाचा अर्जाचा नमुना तयार केला आहे त्या नमुन्यामध्ये सर्व कागदपत्रासह प्रस्ताव सादर करावा, प्राप्त प्रस्तावांचा विचार करण्यात येईल.